Impact Factor – 6.625 E-ISSN – 2348-7143

March- 2021

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY


International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-February-March 2021

Vol.-VIII, Issue-I (B)

**Multidisciplinary Issue**




**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67 ★

120

'RESEARCH JOURNEY' International E-Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol.-VIII, Issue-I (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan.-March 2021

# भगतसिंग यांचे धार्मिक विचार

डॉ. राजेंद्र नामदेव रासकर
इतिहास विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध, पुणे–६७
E-mail : rajendraraskar2550@gmail.com
मोबाईल नंबर–९९६०६५९६८४

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67

## प्रास्ताविक

भगतसिंग यांच्याकडे केवळ क्रांतिकारक या एकाच अंगाने न पाहता ते एक उत्तम लेखक होते. पत्रकार म्हणून यांची कामगिरी महत्वपूर्ण आहे. थोडक्यात लेखक, कवी, साहित्यिक, पत्रकार व समाजसुधारक त्याचप्रमाणे धार्मिक धोरणाबाबत आपले स्पष्ट मत मांडणारे होते. त्यांच्या धार्मिक विचारांचे चिंतन होणे आवश्यक आहे. म्हणूनच त्यांच्या धार्मिक विचारांची मांडणी या लेखामध्ये करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## भगतसिंग यांचे वेगळेपण

स्वातंत्र्यदेवीच्या वेदीवर ऐन तारूण्यात केलेले हौतात्म्य, एवढेच त्यांच्या लोकप्रियतेचे रहस्य नाही. त्यांच्या बरोबर, त्यांच्या पूर्वी व नंतर अनेक तरूण शहीद झाले. परंतू इतरांची नावे दीर्घ काळापर्यंत लोकांच्या लक्षात नाहीत. भगतसिंग केवळ स्वातंत्र्यासाठी लढत नव्हते. तर स्वातंत्र्यानंतर या देशात नवीन समाजरचना निर्माण करणे आवश्यक आहे. त्यांचे स्वप्नही त्यांच्या डोळ्यासमोर नेहमी तरळत होते. त्याचा ध्यास हा स्वातंत्र्यप्राप्ती इतकाच त्यांच्या लढ्यचा अविभाज्य भाग होता. बुध्दिप्रामाण्य, सामाजिक विचारसरणी, मानवता, बंधूता व एकता या वरील अव्यभिचारी निष्ठा या सर्व प्रकारच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय शोषणाविरूध्द बंडाची भूमिका, ढोंग दांभिकपणा, उक्ती व कृतीतील विसंगती, अंधश्रध्दा, परंपराप्रियता, पोथीनिष्ठा व गुलाम मानसिकता यांचा मनस्वी तिटकरा, जातिव्यवस्था व अस्पृश्यता यांना सतत विरोध, तर जात, धर्म, वंश, लिंग, भाषा आणि प्रदेश या कारणांनी माणसा–माणसांत भेद करणाऱ्यांचा त्यांनी सातत्याने तीव्र विरोध केला. ही त्यांच्या सामाजिक तत्वज्ञानाची वैशिष्टे होती. बध्दिप्रामाण्याची कास धरल्यामुळेच ते नास्तीक होते. आधुनिक पुरोगामी मानवतावादी तत्वज्ञानाची हीच सूत्रे आहेत. या तत्वांवर त्यांची विवेकनिष्ठ श्रध्दा होती. त्याबाबतीत त्यांना कुठलीही तडजोड मान्य नव्हती.[१]

अशा प्रकारे भगतसिंग यांनी आपले राष्ट्र एक संघ राहवे या उद्देशाने सर्व–जाती–धर्मातील जनतेला मार्गदर्शन केले. कारण जात, धर्म, वंश, धर्म असा भेदभाव आपण करीत बसलो तर त्याचा फायदा ब्रिटिशांना होईल. त्यामुळे सर्वांनी ऐक्य, समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने राष्ट्राला मदत करावी असा दृष्टीकोन भगतसिंग यांचा होता.

## देव–धर्माबद्दल अनास्था

भगतसिंग यांना लहानपणापासूनच देव–धर्म हे क्रांतिकार्यातील अडथळे आहेत याची जाणीव होती. ते साधारण नऊ वर्षाचे होते तेव्हाची गोष्ट आहे. त्यांची धाकटी बहिण अमरकौर हिला एकदा एका जुन्या धर्मग्रंथातील काही पाने सापडली. ती तिने उत्सुकतेने आपल्या वीरजीला दाखवली. ती पाने वाचून भगतसिंग बहिणीला म्हणाले हे बघ अमरो! आम्हांला ब्रिटिशांबरोबरच धर्मालाही हद्दपार करावे लागेल. या दोघांनी आमच्या

121

भगतसिंग यांनी धार्मिक विचार मांडत असताना देशहिताच्या दृष्टीने जात–धर्म अडचण निर्माण करणारे आहेत. त्यामुळे हिंदू–मुस्लिम–शीख यांना एकत्रितपणे शांत मार्गाने डोक्यावर बर्फ ठेवून वागावे. यातच सर्वांचे भले आहे. सर्वांनी एकत्रितपणे सुख–समृध्दीने रहावे अशी त्यांची भूमिका होती.

**दंगलीमागे नेमके कोण?**

भगतसिंग यांनी दंगली मागे नेमके कोण आहेत हे स्पष्ट करताना त्यांनी म्हटले आहे दंगलींच्या पाठीमागे धर्मांध नेते आणि वर्तमानपत्रे यांचा हात आहे. आज हिंदुस्थानच्या नेत्यांनी इतकी वाईट परिस्थिती निर्माण केली आहे की त्याविषयी न बोललेलेच बरे! ज्या नेत्यांनी भारताला स्वतंत्र करण्याचा विडा उचलला होता आणि जे 'समान राष्ट्रीयता' आणि स्वराज्य स्वराज्य म्हणून बढाया मारताना थकत नव्हते ते एक तर आज घरात तोंड लपवून बसले आहेत किंवा धर्मांधतेच्या प्रवाहात वाहवत चालले आहेत. घरात तोंड लपवून बसणाऱ्यांची संख्यादेखील कमी नाही आणि धर्मांधतेचा असा काही महापूर आला आहे की ते देखील त्याला बांध घालू शकलेले नाहीत. असे वाटते की भारतात नेतृत्वाचे दिवाळे निघाले आहे. या धर्मांध दंगली भडकविण्यात विशेष वाटा असणारे दुसरे सदगृहस्थ म्हणजे वर्तमानपत्रवाले. एकेकाळी अत्यंत उच्च व पवित्र समजला जाणारा पत्रकारितेचा व्यवसाय आज अत्यंत किळसवाणा झाला आहे. हे लोक एकमेकांच्या विरोधात मोठे–मोठे मथळे देऊन डोकी फोडण्याचे काम करवून घेतात. स्थानिक वृत्तपत्रांतून भडक लेख प्रसिध्द झाल्यामुळे एक–दोनच नाही तर अनेक ठिकाणी दंगली झाल्या आहेत. अशा काळातही डोके व मन शांत ठेवून लिहिणारे लेखक फार कमी आहेत. लोकांना शिक्षण देणे त्यांच्यावरील संकुचित प्रवृत्ती दूर करणे धार्मिक भावना दूर करणे, परस्पर मिळून–मिसळून राहण्याची वृत्ती वाढविणे आणि भारताची सामुहिक राष्ट्रियता नष्ट करणे हेच आपले प्रमुख कर्तव्य मानले आहे. त्यामुळेच भारताच्या सद्यःस्थितीचा विचार करता डोळयातून रक्ताश्रू वाहू लागतात आणि हृदयात प्रश्न उभा राहतो की, भारताचे होणार तरी काय? [५]

भगतसिंग यांनी भारतातील तत्कालीन स्थितीची माहिती दिलेली आहे. त्यांना भारत देशाची काळजी लागली आहे. कारण जर अशीच स्थिती राहिली तर आपल्या देशाचे काय होणार अशी त्यांनी चिंता व्यक्त केली आहे.

**देवाचा उगम कसा झाला?**

भगतसिंग म्हणतात देवाचा उगम कसा झाला याबद्दल माझी स्वतःची कल्पना अशी आहे की माणसाच्या मर्यादा, दुबळेपणा, त्रुटी यांची झालेली जाणीव विचारात घेऊन सर्व परिस्थितींना धैर्याने तोंड देण्यासाठी सर्व प्रकारच्या संकटांना खंबीरपणे सामोरे जाण्यासाठी भरभराटीच्या व समृध्दीच्या काळात माणसाला आवर घालून त्यांच्या वागण्यावर ताबा ठेवण्यासाठी देवाचे काल्पनिक अस्तित्व निर्माण करण्यात आले. स्वतःचे खास असे दिवस व आई–बापांची उदार सहृदयता व दोहोंना परिपूर्ण अशा देवांची कल्पना जास्त तपशिलवारपणे पुढे रंगवली गेली. माणूस समाजाला विघातक ठरू नये यासाठी प्रतिबंधक उपाय म्हणून देवाचा उपयोग व्हावा, ह्या हेतूने दैवी कोप व नियम या कल्पना मांडल्या गेल्या. देवाची दयाळू व वात्सल्य वृत्ती वर्णिल्याने तो पिता, माता, भगिनी, बंधू, मित्र मदतनीस अशा उपयोगी वाटू लागला. विश्वासघात झाल्यामुळे किंवा आप्तस्वकीयांना दूर केल्यामुळे मनुष्य जेंव्हा अत्यंत निराश अवस्थेत असेल, तेंव्हा आपल्या मदतीला व आधार द्यायला आपला एक सच्चा मित्र अजूनही आहे आणि तो विधाता आहे. सर्व शक्तीमान आहे या कल्पनेमुळे त्याचे सांत्वन होते. आणि समाजाच्या आदिम अवस्थेच्या काळात ही गोष्ट खरोखरच उपयोगी होती नैराश्यामध्ये असलेल्या माणसाला ईश्वराच्या संकल्पनेचे फार साह्य होते. [६]

122

४. भगतसिंग 'भगतसिंग म्हणाले निवडक उदाहरणे' ऐरण प्रकाशन मुंबई २०१९ पृष्ठ क्र. ०६.

५. भगतसिंग 'जाति–धर्मांचे–झगडे सोडा खऱ्या लढ्यशी नाते जोडा' ऐरण प्रकाशन मुंबई २०१६ पृष्ठ क्रं. ६

६. उपरोक्त चमनलाल 'शहिद भगतसिंग समग्र वाङ्मय' डायमंड प्रकाशन पुणे २००७ पृष्ठ क्र. २२८

७. भगतसिंग – 'मी नास्तिक का आहे?' आणि स्वप्ननगरीची प्रस्तावना ऐरण प्रकाशन मुंबई २०१६ पृष्ठ क्रं. १९ व २०.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

123